# दि मालेगांव मर्चन्टस् को ऑप बँक लि.

।। आपली बँक, आपली माणसं ।।

## ६१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा- सन २०२२-२३ च्या सभेची नोटीस

वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस (फक्त सभासदांसाठी)

बँकेच्या सर्व सभासदांना विनंतीपुर्वक कळविण्यात येते की, बँकेची ६१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २३/०९/२०२३ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता खालील विषयांचा विचार विनिमय करण्यासाठी मा.चेअरमन श्री.गौतम रमेशचंद्र शाह यांचे अध्यक्षतेखाली आय.एम.ए. हॉल, एल.आय.सी. ऑफिसच्या मागे, कॅम्परोड, मालेगांव जि.नासिक येथे आयोजित केली आहे. तरी या सभेस आपण सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

## सभेपुढील विषय

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दि.०२/०७/२०२२ रोजीच्या सभेचे इतिवृत वाचून कायम करणे.
२. संचालक मंडळ यांनी तयार केलेला सन २०२२-२३ सालाचा कामकाजाचा अहवाल व आर्थिक तक्त्यांचा म्हणजे दि. ३१.०३.२०२३ अखेरचे नफातोटा पत्रक व ताळेबंदास मंजूरी देणे.
३. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२२-२३ वर्षाच्या नफा वाटणीस मंजूरी देणे.
४. सन २०२१-२२ च्या वैधानिक लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे.
५. सन २०२२-२०२३ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची वाचून नोंद घेणे.
६. संचालक मंडळाने तयार केलेल्या सन २०२३-२०२४ च्या अंदाजपत्रकास व मागील वर्षी अंदाजपत्रकापेक्षा अधिक झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
७. सन २०२३-२०२४ करिता अंतर्गत तपासणीसांची नेमणूक केल्याची व त्यांचा मेहनताना ठरविणेबाबत.
८. सन २०२३-२४ या सालाकरिता सी.पी.लोढा ॲन्ड कंपनी नासिक यांची वैधानिक लेखापरिक्षक म्हणुन रिझर्व्ह बँकेकडुन झालेल्या फेर नेमणुकीस मंजुरी देणे व त्यांचा मेहनताना ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे.
९. एकरकमी कर्ज परतफेड योजना तसेच राष्ट्रीय लोकअदालत अंतर्गत अहवाल वर्षात बंद केलेल्या कर्ज खात्यांची नोंद घेणे.
१०. बँकेचे मा.संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाचे सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(२) नुसार माहिती घेऊन नोंद घेणे.
११. बँकेच्या टिळकरोड शाखेसाठी ४० गांव फाटा, लोणवाडे शिवार ता.मालेगांव येथे तसेच संगमेश्वर शाखेसाठी स्वमालकीच्या प्रस्तावित जागा खरेदी करण्यास मान्यता देणे.
१२. वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर न राहु शकलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१३. मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

संचालक मंडळाच्या आदेशावरुन

दिनांक:०८.०९.२०२३

**कैलास ए. जगताप** — **जनरल मॅनेजर**

**श्री.गौतम रमेशचंद्र शाह** — **चेअरमन**

### विशेष सुचना :-

१) कोरम अभावी सभा अर्धा तास तहकूब ठेवून त्यानंतर सभेचे कामकाज त्याच ठिकाणी विषय पत्रिकेत नमूद केलेल्या विषयांचा विचार करण्यासाठी सुरू केले जाईल.
२) ज्या सभासदांना सभेत अहवाल वर्षातील कामकाजासंबंधी प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी दि.१४/०९/२०२३ अखेर कामकाजाच्या वेळेत बँकेच्या प्रशासकीय कार्यालयात लेखी आणून देण्याचे करावे.
३) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त बँकेच्या मुख्य कार्यालयात व शाखा कार्यालयात कामकाजाच्या वेळेत उपलब्ध आहे.
४) सन २०२२-२०२३ चा वैधानिक तपासणी अहवाल कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत बँकेच्या प्रशासकीय कार्यालयात पहावयास मिळेल.
५) कृपया सभेस येतांना ओळखपत्र व अहवालाची प्रत सोबत आणावी.

**आपली बँक... आपली माणसं...**